# अमृतधारा

"आर्यनऽऽ.... कशी आहे रे सई !!" धाईतच आर्यन जवळ येत सुमनताई विचारु लागल्या

"लाल दिवा लागून बराच वेळ झालाय ना आई!!"
ऑपरेशन थिएटर बाहेर येरझाऱ्या घालतच केसात हात फिरवत आर्यन बोलला

क्षणाक्षणाला त्याच्या चेहऱ्यावर वाढलेलं टेन्शन आणि भयभीत चेहरा बघून बाबांनी त्याला धीर दिला. खरंतर दोघांच्याही घरचे लोकं अगदी काळजीत होते. सईची परिस्थिती नाजूकच झाली होती.

प्रेगनन्सी दरम्यान नवव्या महिन्यात सईला काहि प्रमाणात कोरोना लागण झाली. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार काळजी घेणं सुरू होतच. आणि आत्ता ऑपरेशन चालू होत. पण बराच वेळ लागत होता. सगळ्यांची बेचैनी स्पष्ट जाणवत होती. इतक्यात बाळाच्या रडण्याचा आवाज आला. त्या आवाजाने सगळे आनंदित झाले पण डॉक्टर बाहेर येईपर्यंत भीती होतीच.

एकदाचा लाल दिवा बंद झाला आणि काही वेळातच डॉक्टर भावे बाहेर आले डॉक्टरांनी मुलगी झाल्याचं सांगितलं. अभिनंदन केलं. आर्यन त्याच्या परी साठी खूश झाला...... पण लगेच त्याने बाळाची आणि सईच्या तब्येतीची बि विचारणा केली.

डॉक्टरांनी सईची तब्येत ठीक आहे पण काळजी घ्यावी लागणार असल्याचं सांगितलं.
"Luckily बाळाला कोरोना लागण नाहि झाली हे आपलं नशीब समजा. थोड्याचवेळात आम्ही त्यांना स्पेशल वॉर्ड मध्ये शिफ्ट करु. तेव्हा तुम्ही त्यांना पाहू शकणार असल्याचं सांगितलं आणि जायला निघाले.

आणखी एक गोष्ट Mr. आर्यन ,,,,,,
हा डॉक्टर,,, बोला ........
कोरोना पेशंट असल्यामुळे तुमच्या वाईफ, बाळाला breast feeding (स्तनपान) करु शकणार नाहीत. त्यात बाळ काही दिवस लवकर (Premature)